भारतीय जैन संगठन
BJS
Bharatiya Jain Sangathan
Head Office :
Ground Floor, Muttha Towers, Loop Road, Near Don Bosco Church, Yerawada, Pune 411006
Tel.: 020 4120 0600, 4128 0012, 4128 0013
Website : www.bjsindia.org E mail : info@bjsindia.org Facebook : www.facebook.com/BJSIndia

**प्रसिध्दीसाठी**

दिनांक : २३.१२.२०१४

**भारतीय जैन संघटना आयोजित**
**२४ वे मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीर**

भारतीय जैन संघटना, संचेती हॉस्पिटल पुणे व चांदमल मुनोत (नेवासकर) ट्रस्ट अहमदनगर यांचे संयुक्त विद्यमाने विश्वविख्यात प्लॅस्टिक सर्जन स्वर्गीय डॉ. शरदकुमार दिक्षीत (अमेरिका) यांचे स्मरणार्थ ''२४ वे मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीर'' दिनांक ७ ते १० जानेवारी २०१५ या कालावधीत संचेती हॉस्पिटल, पुणे येथे आयोजित करण्यात आले असल्याचे डॉ. पराग संचेती, श्री. प्रफुल्ल पारख व हस्तीमल मुनोत यांनी कळविले आहे.

स्वर्गीय डॉ. शरदकुमार दिक्षीत (अमेरिका) यांनी मोफत प्लास्टिक सर्जरी शिबीराचे माध्यमातून ४२ वर्षात २,६६,००० मोफत शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केल्या आहेत. मानवसेवेचा हा महायज्ञ त्यांचे अमेरिकेतील सुशिष्य प्रसिध्द प्लास्टिक सर्जन डॉ. लॅरी वेइंस्टेन (अमेरिका) व त्यांचे सहकारी डॉक्टर्स यांनी गेली तीन वर्षांपासून पुढे चालू ठेवला आहे. या शिबीरामध्ये अंदाजे ६०० ते ७०० रूग्णांवर यशस्वी मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

या शिबीरांमध्ये मुख्यत्वे दुभंगलेले ओठ व चेहऱ्यावरील विद्रुप व्रण व डाग, नाक व कान यावरील बाह्यव्यंग, पापण्यामधील विकृती अशा प्रकारच्या सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर असणाऱ्या महागडया शस्त्रक्रिया विनामूल्य करण्यात येणार असल्याचे शिबीर प्रमुख श्री. शशिकांत मुनोत यांनी कळविले आहे.

हे शिबीर जरी चार दिवस चालणार असले तरी रूग्णांची नोंदणी व तपासणी फक्त दिनांक ७ जानेवारी २०१५ रोजी या एकाच दिवशी सकाळी ९.०० ते ०१.०० होणार असुन उर्वरीत वेळी शस्त्रक्रिया पार पडणार आहेत.

शिबीराविषयी अधिक माहितीसाठी श्री. शशिकांत मुनोत (९४२०४ ७७०५२) यांचेशी संपर्क साधावा.

---

प्रति,
संपादक

सप्रेम नमस्कार,

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये / साप्तहिकामध्ये / मासिकामध्ये वरील बातमीस जास्तीत जास्त प्रसिध्दी द्यावी ही विनंती.

आपला स्नेहांकित

प्रफुल्ल पारख

**BJS**
Bharatiya Jain Sangathan

भारतीय जैन संगठन,
संचेती हॉस्पिटल, व
चांदमल मुनोत (नेवासकर) ट्रस्ट, अहमदनगर
यांच्या संयुक्त विद्यमाने

स्वर्गिय डॉ. शरदकुमार दिक्षीत
यांचे स्मरणार्थ

# मोफत
# प्लॅस्टीक सर्जरी शिबीर

## दि. ७, ८, ९, १० जानेवारी, २०१५

डॉ. लॅरी वेईस्टेन (अमेरिका) व सहकारी यांचे मार्फत

**सदर शिबीरात खालील रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येतील**

- ★ नाक व कान यावरील बाह्यविकृती
- ★ चेहऱ्यावरील व्रण व डाग
- ★ पापण्यांची विकृती
- ★ दुभंगलेले ओठ



**रुग्ण नोंदणी व तपासणी**
**बुधवार दि. ७ जानेवारी, २०१५**
**सकाळी ९:०० ते दुपारी २:००**
**तपासणीसाठी उपाशीपोटीच यावे**

**स्थळ: संचेती हॉस्पिटल,** शिवाजीनगर, पुणे. फोन : ८८८८८ ०८८४५

टिप : जळालेल्या, भाजलेल्या व पांढरे डाग असलेल्या रुग्णांना या शिबीरात भाग घेता येणार नाही

- मार्गदर्शक -

**श्री. शांतीलाल मुथ्था**
संस्थापक, भारतीय जैन संगठन

**पद्मभूषण डॉ. के. एच. संचेती**
संस्थापक, संचेती हॉस्पिटल

-विनीत-

**श्री. प्रफुल्ल पारख,** राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय जैन संगठन

**डॉ. पराग संचेती,** चेअरमन, संचेती हॉस्पिटल

**श्री. हस्तीमल मुनोत** अध्यक्ष चांदमल मुनोत ट्रस्ट

- संपर्क -

**शशिकांत मुनोत 94204 77052**

19.11.2014/BJS PS-2015/10,000